# परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती

विद्यार्थी परिचारिका वसतिगृह इमारत, तळ मजला,सेंट जॉर्जेस रूग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
वेबसाईट: msbnpe.org ई-मेल- ppasss२०२२@gmail.com ,मो. नं: ०२२ २२६११०१५

**NURSING DIPLOMA COURSE SHIKSHAN SHULKA SAMITI**

Student nurses hostel building, Ground floor, St. Georges hospital campus, p.d'melo road, Fort, Mumbai-४०० ००१
website: www.ndcsss.info.com e-mail- ppasss2022@gmail.com, mobile no- ०२२ २२६११०१५


क्र पपाअशिशुस /शिक्षण शुल्क समिती/ बैठकीचे इतिवृत्त /६४ /२०२४ दिनांक: २५ /०९ /२०२४

प्रति,

१. संचालक, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई.
२. अधिक्षिका, शुश्रुषा, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
३. सहाय्यक संचालक, (लेखा), वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
४. प्रंबधक, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई.

विषय :- शिक्षण शुल्क समितीच्या बैठकीचे इतिवृत.

संदर्भ : १. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.८९/२०/ शिक्षण-१, दिनांक.१३.१२.२०२२.

उपरोक्त शासन निर्णयान्वये गठित करण्यात आलेल्या शिक्षण शुल्क समितीची बैठक आयुक्त तथा अध्यक्ष, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली बैठक दि.१३/०९/२०२४ रोजी दुपारी २.०० वाजता, आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सोबत पाठविण्यात येत आहे.

(वैशाली सुळे)
उपसचिव तथा सदस्य सचिव
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

प्रत,

१. मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई. यांचे स्वीय सहाय्यक.
२. उपसचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई. यांचे स्वीय सहाय्यक.
३. मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई. यांचे स्वीय सहाय्यक.
४. सहाय्यक संचालक, (लेखा), वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई. यांचे स्वीय सहाय्यक.
५. सह संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई. यांचे स्वीय सहाय्यक.
६. मुख्य प्रशासकीय अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.

# बैठकीचे इतिवृत्त

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग-शासन निर्णय क्र. संकीर्ण ,२०२०.प्र.क्र/८९/२०-शिक्षण /१ दि.१३.१२.२०२२ अन्वये ए.एन.एम., जी.एन.एम. व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांचे शिक्षण शुल्क निर्धारित करण्यासाठी "शिक्षण शुल्क समिती" गठीत करण्यात आली आहे. सदर समितीची बैठक दि.१३.०९.२०२४ रोजी मा.आयुक्त (वैद्यकीय शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली ,आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई, यांच्या दालनात दुपारी ०२.०० वाजता आयोजित करण्यात आली होती .सदर बैठकीत खालील अधिकारी उपस्थित होते-:

१) उप सचिव तथा सदस्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई.
२) संचालक, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ ,मुंबई.
३) सहाय्यक संचालक, (लेखा) वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
४) प्रबंधक, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ ,मुंबई.
५) श्री. कैलास गांधी निमंत्रित सनदी लेखापाल.
६) श्रीमती. वैशाली बापट निमंत्रित परिव्यय लेखापाल.

| अ.क्र | मुद्दा | बैठकीत झालेले निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| १ | शै.व. २०२३-२४ साठी ०२ परिचर्या संस्थांचे शुल्क पुनर्विलोकन प्रस्ताव शुल्क मान्यतेसाठी समितीसमोर सादर. | शै.व. २०२३-२४ साठी खालील ०२ परिचर्या संस्थांच्या अभ्यासक्रमांचे शुल्क पुनर्विलोकन प्रस्ताव मान्यतेसाठी समितीसमोर सादर केले गेले.<br>**१) ०९४२ - औरंगाबाद ट्रेनिंग स्कूल ऑफ नर्सिंग, शिवाजीनगर औरंगाबाद GNM -**<br>- परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समितीने अदा न केलेल्या वेतनातील केवळ ३ महिन्यांच्या वेतनाची रक्कम ग्राह्य ठरविण्यात आलेली आहे.<br>- विद्यार्थ्यांशी निगडित खर्च मान्य करण्यात आले आहेत.<br>**पुनर्विलोकन मंजूर शुल्क - रु. ४६०००**<br>**२) ०५४२ - दिंडोरी स्कूल ऑफ नर्सिंग, दिंडोरी, नाशिक GNM**<br>- परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समितीनेअदा न केलेल्या वेतनातील केवळ ३ महिन्यांच्या वेतनाची रक्कम ग्राह्य ठरविण्यात आलेली आहे.<br>- विद्यार्थ्यांशी निगडित खर्च मान्य करण्यात आले आहेत.<br>**पुनर्विलोकन मंजूर शुल्क - रु. ३८०००** | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |

| अ.क्र | मुद्दा | बैठकीत झालेले निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| २. | शै.व. २०२१-२२ मध्ये शिक्षण शुल्क प्राधिकरण कडे प्रस्ताव दाखल न केलेल्या संस्थांना (साईराम स्कूल ऑफ नर्सिंग, रामटेक.ANM) शै.व. २०२१-२२ व शै.व.२०२२-२३ चे शिक्षण शुल्क मंजूर करणेबाबत. | शै.व. २०२१-२२ मध्ये शुल्क नियामक प्राधिकरण कडे प्रस्ताव दाखल न केलेल्या साईराम स्कूल ऑफ नर्सिंग, रामटेक,ANM या संस्थेने शै.व.२०२३-२४ साठी समितीकडे शुल्क मंजुरीकरिता कोणताही प्रस्ताव विहित कालावधीत सादर केलेला नसल्याचे निदर्शनास आले आहे. तरीही महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक मंडळ, मुंबई यांनी संबंधित संस्थेच्या कागदपत्रांची सखोल तपासणी करून त्याबाबतचा अहवाल परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती कडे सादर करावा असे निर्देश दिले गेले. | महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक मंडळ, मुंबई |
| ३. | शै.व.२०२४-२५ साठी ऑनलाईन प्रस्ताव मागविण्याकरिता ऑनलाईन पोर्टलमधील सुधारणांबाबत चर्चा व मंजुरी. | शै.व.२०२४-२५ ए.एन.एम. व जी.एन.एम. व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रमाचे शुल्क निश्चीती करण्याकरीता ऑनलाईन सिस्टीम पोर्टल मध्ये आवश्यक ते बदल गरजेनुसार करण्याचे ठरविण्यात आले.<br><br>शुल्क नियामक प्राधिकरणाच्या धर्तीवर सलग दुसऱ्या वर्षाकरिता NO upward Revision चा पर्याय संस्थांना देण्याचे ठरविले आहे.<br><br>ए.एन.एम. व जी.एन.एम. व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रमांव्यतिरिक्त इतर अभ्यासक्रमांसंबंधीत असलेले पर्याय वगळण्यात यावेत. | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती<br><br>Bynaric systems pvt. Ltd. |
| ४. | शै.व.२०२४-२५ साठी शिक्षण शुल्क प्रस्तावाकरिता ठरविण्यात येणाऱ्या मानकांवर चर्चा व मंजुरी. | शै.व.२०२४-२५ ए.एन.एम. व जी.एन.एम. व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रमाचे शुल्क निश्चीती करण्याकरीता शुल्क नियामक प्राधिकरणाच्या धर्तीवर काही मानकांमध्ये बदल करण्याचे ठरविण्यात आले आहे.<br>- संदर्भित आर्थिक वर्षात अदा न केलेल्या वेतनाबाबत (Salary provision)<br>- अंतिम मंजूर शुल्काच्या अधिकतम १५% शुल्कवाढ | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |

| अ.क्र | मुद्दा | बैठकीत झालेले निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| ५. | शै.व.२०२४-२५ साठी शिक्षण शुल्क प्रस्ताव भरण्याकरिता संस्थांना अभिमुख (ओरिएंट) करण्याकरिता ऑनलाईन माहितीपर परिसंवादाचे आयोजन. | शै.व.२०२४-२५ साठी शिक्षण शुल्क प्रस्ताव भरण्याकरिता संस्थांना अभिमुख (ओरिएंट) करण्याकरिता ऑनलाईन माहितीपर परिसंवादाचे आयोजन करण्याचे निर्देश मा. अध्यक्ष यांनी दिले. त्याकरिता झूम पोर्टलवर ऑनलाईन मीटिंग आयोजित करून वेळापत्रकानुरूप सर्व संस्थांना ऑनलाईन पोर्टल व मानकांबाबत माहिती देण्यात यावी. तसेच याकरिता झूम मीटिंग पोर्टलची ऑनलाईन सदस्यता (subscription) खरेदी करण्याचे बैठकीत मंजूर करण्यात आले.( अंदाजे रक्कम रु. ७०००/-). | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |

समितीची पुढील बैठक आयुक्त तथा अध्यक्ष यांच्या आदेशानुसार सूचित करण्यात येईल. उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

प्रबंधक,
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ
तथा सदस्य

सहाय्यक संचालक (लेखा),
वैद्यकिय शिक्षण व संशोधन,
तथा सदस्य

संचालक,
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ
तथा सदस्य

उप सचिव,
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
तथा सदस्य सचिव

आयुक्त (वैद्यकीय शिक्षण),
तथा अध्यक्ष